मुख्य अभियंता (पथ) कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जावक क्रमांक - पथ ६४
दिनांक :- २९/०४/१७

**वर्कऑर्डर**

मा.सचिव,
महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था,
कर्वेनगर, पुणे ५२.

यांजकडेस------

विषय : - संस्थेच्या बाया कर्वे वसतिगृह सर्व्हे नं.२१/१, कर्वेनगर पुणे ५२ येथील पावसाळी पाणी पुणे महानगरपालिकेचे पावसाळी पाणी लाईनला जोडण्यास ओपन ट्रेंचींग पध्दतीने रस्ता खोदाई परवानगी मिळणेबाबत.

रस्त्याचे नाव :- संस्थेच्या बाया कर्वे वसतिगृह सर्व्हे नं.२१/१, कर्वेनगर पुणे ५२.

संदर्भ : - १. मा.स्थायी समिती ठ.क्र.१२५ दि.०५.०५.२०१५ व मा.मुख्य सभा ठ.क्र.७० दि.२२.०६.२०१५ व महापालिका आयुक्त ठराव क्र.६/११२ दि.०७.०७.२०१५ तसेच मुख्य अभियंता पथ विभागाकडील कार्यालयीन परिपत्रक जा.क्र.पथ/१९९३ दि.१०.०७.२०१५ अन्वये नविन खोदाई चार्जेस आकारणेस मान्यता.

२. मुख्य अभियंता (पथ) विभागाकडील आ.क्र.पथ/२/११९ दि. ०६/०४/१७ चा अर्ज.

३.मा.मुख्य अभियंता (पथ) ठ.क्र. १/३५ दि. २१/०४/२०१७.

४. डिमांड नोट जा.क्र.पथ/३६४ दि. २१ /०४/२०१७.

५. पुणे महानगरपालिका कोषागारात जमा र.रू. ३३,२८२/-, चलन क्र.५९११० दि. २८ /०४/२०१७.

संदर्भ क्र.२ चे अर्जास अनुसरून आपणास खालीलप्रमाणे रस्ता खोदाई करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१. खोदाई करण्याचा रस्ता व ठिकाणे- संस्थेच्या बाया कर्वे वसतिगृह सर्व्हे नं.२१/१, कर्वेनगर पुणे ५२.
२. सुरूवातीचे ठिकाण- नकाशात दर्शविल्याप्रमाणे
३. शेवटचे ठिकाण - नकाशात दर्शविल्याप्रमाणे
४. खोदाई परवानगी एकुण लांबी ६ र.मी.
अ) पी.व्ही.सी. पाईप/आर.सी.सी. पाईप -०० र.मी.
ब) डांबरी रस्ता - ०६ /- र.मी.
क) फुटपाथ रस्ता- ०० र.मी.
ड) एच.डी.डी. -०० र.मी.
इ) पीट - ०० चौ.मी.
५. खोदाई सुरूवात दि. २९/०४/२०१७.
६. खोदाई परवानगी अंतिम दि. ३०/०४/२०१७.

**खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे.**

१. मा. मुख्य सभा ठराव क्र.५० दि. २०/०५/२०१४ मधील सर्व बाबी बंधनकारक राहतील.
२. टेली कम्युनिकेशन कंपन्या/ केबलधारकांना महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडील DIT/फाईल-०३/३३६, मंत्रालय, मुंबई दि. ०१/०४/२००६ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

३. पुणे महानगरपालिकेची खोदाई बाबतची मार्गदर्शिका पुस्तिका ही पथ विभागाकडे उपलब्ध आहे. सदर मार्गदर्शिका पुस्तिकेमधील सर्व बाबींचे पालन करणे खोदाईधारक कंपन्यांना बंधनकारक राहील.

४. खोदाई करण्यापुर्वी जी.पी.आर.एस. वापर करून अस्तित्वातील जमिनीखालील सर्व्हीसेस बाबतचा सर्व्हे करुन, त्याप्रमाणे सेवावाहिन्या टाकण्यासाठीचा सुरक्षित मार्ग निश्चित करुन त्याचे नकाशे संबंधित अभियंत्यांना दाखवावेत. त्याप्रमाणे संबंधित भागातील अभियंत्यांशी समन्वय साधून काम करावे.

५. खोदाईधारक कंपन्यानी त्यांचे केबल/पाईपलाईन ही रस्त्याचे पृष्ठभागापासुन त्यांचे जबाबदारीवर सुरक्षित खोलीवर टाकावी. रस्त्याखालील अस्तित्वातील पाण्याच्या लाईन/ ड्रेनेजलाईन/इलेक्ट्रीक केबल्स इ. सर्व्हीस वाहिन्यांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी. कोणत्याही वाहिन्यांचे/चेंबर्सचे नुकसान झाल्याचे आढळल्यास त्याची दुरूस्ती संबंधित कंपनीने स्वखर्चाने विनाविलंब करून द्यावी अन्यथा आपणावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. खोदाई करताना अन्य सेवावाहिन्यांना इजा/हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. अपवादात्मक परिस्थितीमध्ये अन्य सेवा वाहिन्यांची दुरुस्ती करताना कराव्या लागणाऱ्या खोदाईचे शुल्क संबंधित कंपनीस रितसर पुणे मनपाकडे अदा करावे लागेल.

६. खोदाई करणाऱ्या कंपनीने परिसरातील नागरिकांना/वाहतुकीस कमीत कमी गैरसोय होईल याची दक्षता घेऊन काम करावयाचे आहे. रस्त्यावर खोदाईचे कामे करताना वाहतुकीस मार्ग खुला सोडुन त्याप्रमाणे व्यवस्था करून काम करवयाचे आहे. रस्त्यावरील गर्दीच्या वेळा टाळुन इतर वेळी काम करणेस प्राधान्य द्यावयाचे आहे. रस्ता खोदाई झाल्यानंतर तातडीने पाईपलाईन/केबल टाकुन खोदाई बुजविणे, राडारोडा उचलणे,चेंबर्स बांधणे व रस्ता पुर्ण साफ करून वाहतुकीस मोकळा करणे ही कामे तातडीने पुर्ण करावीत. काम करताना एका वेळेस एका रस्त्याच्या कमाल १०० मी.पर्यंतच्या लांबीच्या रस्त्याचेच काम हाती घ्यावे.

७. खोदाईची परवानगी प्राप्त झाल्यावर संबंधित पथ विभागाकडील अभियंत्याशी संपर्क साधुन मान्य अलाईनमेंटनुसार प्रत्यक्ष काम करावयाचे आहे.

८. वर नमुद खोदाईची लांबी, सुरूवातीचे व शेवटचे ठिकाण तसेच खोदाई सुरूवात दिनांक व शेवट दिनांक यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येऊ नये.

९. काही कारणांमुळे वर नमुद खोदाईच्या सुरूवात व अंतिम दिनांकामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.कार्यकारी अभियंता यांना राहील. त्याप्रमाणे खोदाई कंपनीस लेखी संपर्क साधुन कळविण्यात येईल व ते कंपन्यांवर बंधनकारक राहील.

१०. एकाच रस्त्यावर विविध कंपन्याकडुन खोदाई होणार असल्यास त्याप्रमाणे सर्व कंपन्यांनी एकत्र येऊन सहमतीने केबल टाकण्याचे नियोजन करावे.

११. त्यानुसार एकाच रस्त्यांवरील विविध कंपन्यांमध्ये व्यवस्थित समन्वय असणे आवश्यक आहे. तसेच या कंपन्यांनी एकमेकांशी खोदाईबाबत सहकार्य करणेही आवश्यक आहे. परंतु या सर्व कंपन्यांनी स्वतंत्रपणे अर्ज करून स्वतंत्रपणे मान्यता घेणे आवश्यक आहे.

१२. आर.सी.सी.कल्व्हर्ट/ नाल्यावरील/नदीवरील पूलावरुन/ फुटपाथवरुन ओपन पध्दतीने केबल टाकण्यास परवानगी नाही. नाल्यावरील पूलावरुन क्रॉस केबल टाकावयाची असल्यास पूलाबाहेरुन स्ट्रक्चरल सल्लागार यांचेकडून रितसर नकाशा घेवून ब्रॅकेट करुन केबल टाकण्याची कार्यवाही करावी.

१३. खोदाईस सुरूवात करण्यापुर्वी जागेवर तसेच मशिनरीच्या भोवती बॅरीगेटस व वॉर्निंग टेप सुचना पाट्या लावुन सदर भाग संरक्षित करावा. रात्रीच्यासाठी रेडीअम रिफ्लेक्टर व सुरक्षिततेबाबत पुर्ण पालन करावे जेणेकरून तेथे कोणताही अपघात होणार नाही याची खबरदारी घ्यावी. या सुरक्षितेबाबत हलगर्जीपणा केल्यास व त्यामुळे कोणताही अपघात घडल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी खोदाईधारक कंपन्यांची राहील.

१४. पुणे महानगरपालिका खोदाई मार्गदर्शिका पुस्तिका, जोडपत्र क्र.९ नुसार खोदाईधारक कंपन्यांनी खोदाई कामाचे ठिकाणी कामाच्या माहितीचा बोर्ड लावणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपन्याच्या केबल खोदाई १०० मी. पेक्षा जास्त लांबीची असल्यास त्यांनी या लांबीच्या दरम्यान मध्ये तसेच चौकांमध्ये बोर्ड लावणे बंधनकारक आहे. सदर बोर्डावर (फलकावर) अ) खोदाई करणाऱ्या कंपन्याचे नाव ब) खोदाई सुरू दि. २९ /०४ /२०१७ क)खोदाई पुर्ण दिनांक- ३०/०४/२०१७ ड)कंपनीकडील प्रतिनिधी/अभियंत्याचे नाव इ)संपर्क क्रमांक/फोन नं.-------- फ) परवानगी/कार्यादेश दि.------- ज)पथ विभागाकडील कनिष्ठ

अभियंताचे नाव व फोन नं या बाबीचा उल्लेख करून 'खोदाई कामामुळे असुविधा होत असलेबद्दल क्षमस्व' असे नमुद करावे.

१५. आवश्यक त्या ठिकाणी पुरेसे सुरक्षा रक्षक व वाहतुक नियोजनासाठी वॉर्डन नेमण्यात यावेत.

१६. रस्त्यावरील पावसाळी जाळ्यांवरील कव्हर्स व पाणी जाण्याची ठिकाणे व्यवस्थित आच्छादन टाकुन झाकावे जेणेकरून खोदाईची माती त्यामध्ये जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१७. खोदाई धारक कंपन्याकडील साईट इनचार्ज/अभियंता यांनी खोदाई मार्गदर्शिका पुस्तिकेतील नमुना-१० नुसार दर आठवड्याला कामाच्या प्रगतीचा अहवाल पुणे महानगरपालिकेकडे सादर करावा.

१८. आवश्यकतेनुसार रस्ता क्रॉसिंगसाठी व मिळकतधारकंच्या गेटसमोर लोखंडी प्लेटचा वापर करावा.

१९. रात्रीच्या वेळी रेडीअम रिफेलक्टर व सुरक्षा विषयक दिवे खोदाईच्या ठिकाणी लावण्यात यावेत.

२०. खोदाईमधील संपुर्ण माती/राडारोडा उचलुन वाहतुक करून हलविण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

२१. खोदाई करणे व त्याचे पुर्नभरणीकरण करणेचा कालावधी संबंधित कंपनीवर बंधनकारक राहील.

२२. रस्ता पातळीपेक्षा , फुटपाथ पातळीपेक्षा उंच कोणतेही चेंबर्स,बॉक्स व कट्टे करण्यास परवानगी नाही. सर्व प्रकारचे चेंबर्स रस्त्याच्या कडेला पुणे महानगरपालिकेकडील अभियंता यांचे सुचनेनुसार घेण्यात यावेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण मंडळाने त्यांचे फिडर पिलर व इतर जमिनीवरील बांधकाम/ सांगाडे यांची कामे करणेपूर्वी स्वतंत्र नकाशासह मान्यता घेऊनच अंमलबजावणी करावी.

२३. खोदाईधारक कंपनीने पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंत्याशी संपर्क साधुन पुर्नडांबरीकरण करणाऱ्या ठेकेदाराशी/एजन्सीशी संपर्क व समन्वय ठेवुन काम करावयाचे आहे. जेणेकरून रिईनस्टेंटमेंटची कामे वेळेत पुर्ण होतील.

२४. कंपनीधारकांनी पुणे महानगरपालिकेशी समन्वय राखणेसाठी अनुभवी अभियंता नेमणे आवश्यक आहे. सदर अभियंत्याने प्रत्यक्ष कामावर देखरेख करणे व पुणे महानगरपालिकेकडे अहवाल देणे अपेक्षित आहे. खोदाईधारक कंपनीने या कार्यदेशाची एक प्रत खोदाईच्या प्रत्यक्ष जागेवर जबाबदार व्यक्तीकडे ठेवणे आवश्यक आहे.

२५. या कार्यआदेशाची प्रत प्राप्त होताच आपण इतर सर्व केबलधारकांशी संपर्क साधुन या विशिष्ठ मार्गावर अन्य कंपन्याची खोदाई होणार अगर कसे याबाबत खातरजमा करून त्याप्रमाणे समन्वय साधुन काम करावे.

२६. प्रत्यक्ष काम करणेपूर्वी ट्रॅफिक पोलिसांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच रहदारीच्या रस्त्यांवर रस्ता क्रॉसिंगची कामे शक्यतो रात्रीच्या वेळेस सुरक्षाबाबतची पुर्ण व्यवस्था करून करावीत.

२७. काही कारणांमुळे आपणास मान्यता दिलेल्या नुसार आपण खोदाई करू शकणार नसल्यास तसे पुणे महानगरपालिकेला तातडीने कळविण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत सदर रस्त्यांवर भविष्यात आपणास खोदाईस परवानगी देता येणार नाही.

२८. विशिष्ठ परवानगीशिवाय सिमेंट कॉक्रिट रस्त्यावर व मास्टीक अस्फाल्ट केलेल्या रस्त्यावर खोदाई करण्यात येऊ नये.

२९. पेव्हर ब्लॉक/फुटपाथमध्ये खोदाई करण्यापुर्वी सदर ब्लाक १००% व्यवस्थित निघतील याकडे लक्ष देऊन सदरब्लॉक काढुन व्यवस्थित ठेवणे. तसेच सदर ब्लॉक पुणे महानगरपालिकेस हस्तांतरण करणे.

३०. डांबरी रस्त्यामध्ये पृष्ठभाग खोदाई करताना ब्रेकर वापरून रस्त्याची खोदाई करावी. जे.सी.बी.चा वापर करून डांबरी पृष्ठभाग खोदाई करण्यात येऊ नये.

३१. खोदाईधारक कंपनीने काम पुर्ण झाल्यावर पुढील ७ दिवसात पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी पुणे महानगरपालिकेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. पुणे मनपाकडील अभियंत्याने प्रत्यक्ष जागा पाहणी करून संपुर्ण राडारोडा व रस्ता साफ झाल्याची खात्री करून पुर्णत्वाचा दाखला द्यावयाचा आहे.

३२. पुणे महानगरपालिकेच्या भविष्यातील रस्ता रूंदीकरणामुळे/फ्लायओव्हर वा तत्सम कामांमुळे जर सदरची टाकण्यात आलेली केबल/पाईपलाईन बदलणे वा हलविणे आवश्यक असल्यास, संबंधित कंपनीने त्यांचे स्वखर्चाने सदर केबल/पाईपलाईन पुणे महानगरपालिकेच्या अभियंत्यांच्या सुचनेनुसार हलविणे/बदलणे बंधनकारक आहे. त्यासाठी पुणे महानगरपालिकेकडुन संबंधित कंपन्याना ७ दिवस आधी लेखी पुर्व कल्पना देण्यात येईल.

३३. प्रत्यक्ष खोदाई करताना वाहतुक वळविण्याची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे संबंधित कंपनीने स्वखर्चाने तशी व्यवस्था करून माहितगार गार्ड/कर्मचारी नेमावे.

३४. पुणे मनपा अभियंत्याचे सुचनेनुसार शक्यतो अस्तित्वातील डक्ट/आर.सी.सी पाईप/पी.व्ही.सी. पाईप यांचा वापर करून खोदाई न करता पाईपलाईन/केबल टाकण्यात यावी. परंतु परवानगीशिवाय व मान्यतेशिवाय कोणत्याही डक्टमधुन केबल/पाईपलाईन नव्याने टाकणेत येऊ नये अथवा दुरूस्ती करू नये.

३५. सदरचा कार्यादेश प्राप्त झाल्यावर खोदाई सुरू करण्यापुर्वी आपल्या कंपनीमार्फत स्थानिक प्रसिध्द वृत्तपत्रातुन खोदाई परवानगी बाबतची माहिती व जाहीर सुचना प्रसिध्दीस द्यावी.सदर वृत्तपत्रातील जाहीर सुचनेचे कात्रण पुणे महानगरपालिकेकडे दाखल करूनच नंतर खोदाईस सुरूवात करावी.

३६. टेली सर्व्हीसेस /ऑप्टीकल फायबर केबल कंपन्या यांनी त्यांचे दाखल महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन प्राप्त परवानगीमधील नमुद डक्ट संख्यानुसारच काम करावे. डक्टची संख्या मान्यतेपेक्षा वाढवु नये अन्यथा कारवाई करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेल्या डक्टच्या संस्थेनुसार पाईप /डक्ट व प्रत्यक्ष केबल कमी टाकल्यानंतर उर्वरित डक्ट/पाईप कोणत्याही कंपनीस भाड्याने हस्तांतरण व व्यापारासाठी उपयोग करता येणार नाही.

३७. रेल्वे पुलाखालुन वा रेल्वे मार्गाखालुन कोणतीही परवानगी देता येणार नाही.

३८. वरील बाबींची पुर्तता न केल्यास आपली परवानगी रद्द करणे वा पुढील निर्णय घेण्याचा तसेच अपवादात्मक परिस्थितीमध्ये अटींमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. मुख्य अभियंता पुणे महानगरपालिका यांचा राहील.

३९. केबलचा कोणताही लुप/भाग रस्त्याच्या /फुटपाथच्या पृष्ठभागावर राहणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४०. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम २३९,२४०, २४१, २४२, ४८१ व या अधिनियमातील अन्य तरतूदी खोदाईधारक कंपन्यावर बंधनकारक राहतील.

कार्यकारी अभियंता (पथ झोन क्र.४)
पुणे महानगरपालिका

प्रत : १)मा.सह.आयुक्त/उपायुक्त क्र.१,२,३ व ४.
२) मा.महापालिका सहाय्यक आयुक्त,झोन क्र. ४ , वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय,पुणे महानगरपालिका
३) संबंधित उप अभियंता
४) कार्यालय अधिक्षक, पथ विभाग